दैनिक जनप्रवास बातम्यांचा राजा

• कोल्हापूर बुधवार,
दि. १० जून २०२६

# संशोधनाचा उपयोग समाजाला व्हावा

## डॉ. बापूजी साळुंखे यांच्या जयंती समारंभात प्रा. मिलिंद जोशी यांचे मत




जनप्रवास : कोल्हापूर

आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे यांचे योगदान खूप मोठे आहे. बापूजींचा वारसा प्रत्येक शिक्षकांनी जोपासणे गरजेचे आहे. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेला समृध्द व संपन्न वारसा आहे. विद्यार्थ्यांमध्ये कुतुहल व ज्ञानलालसा, जिज्ञासा वाढली तरच चांगले संशोधक विद्यार्थी तयार होतील. संशोधनाचा प्रवास प्रयोगशाळेतून समाजापर्यंत व्हायला हवा तरच संशोधनाचा उपयोग समाजाला होईल, असे मत प्रसिध्द लेखक व वक्ते प्रा.मिलिंद जोशी यांनी मांडले. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था आयोजित शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या १०८ व्या जयंती समारंभाचे प्रमुख वक्ते म्हणून शिक्षण : काल, आज आणि उद्या या विषयावर ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे हे होते.

प्रमुख पाहुणे मा.खासदार धनंजय महाडिक म्हणाले, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी अत्यंत प्रतिकुल परिस्थितीत शिक्षणाची गंगा महाराष्ट्रातील गोरगरीबांच्या घरापर्यंत पोहोचवण्याचे अतुलनीय कार्य करुन राज्यभर संस्थेचा विस्तार केला. त्यांचे"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षणप्रसार"हे ब्रीदवाक्य अंगिकारुन शिक्षकांनी विद्यार्थी घडविले पाहिजेत. नाविन्यपूर्णता आणि शैक्षणिक आधुनिकता घडविण्यासाठी सातत्यपूर्ण योगदान विवेकानंद शिक्षण संस्थेने दिले आहे. प्रधानमंत्री कौशल्य योजनांचा लाभ विद्यार्थ्यांनी घ्यावा. आगामी विधानपरिषदेच्या पुणे विभाग शिक्षक मतदार संघातून श्री कौस्तुभ गावडे यांना विजयी करण्यासाठी सर्व गुरुदेव कार्यकर्त्यांनी जीवाचे रान करावे. असे प्रतिपादन केले.

प्रारंभी मान्यवरांनी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या समाधीला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. महेश हिरेमठ व सहकाऱ्यांनी संस्था प्रार्थना व सुमधूर भक्तीगीते सादर केली. विद्या समितीचे अध्यक्ष डॉ. श्रीराम साळुंखे यांनी प्रमुख वक्ते प्रा.मिलिंद जोशी यांची ओळख करुन दिली. आभार संस्था सहसचिव एस. एम. गवळी यांनी मानले. सुत्रसंचालन प्रा.डॉ. सुप्रिया पाटील व डॉ.कविता तिवडे यांनी केले. यावेळी प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे, विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ सी. बी. पाटील, पदाधिकारी उपस्थित होते.

याप्रसंगी संस्थेतील कलाशिक्षक अमर भागवत यांनी तयार केलेल्या शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे यांचे वडील ज्ञानोजीराव साळुंखे यांचे व स्वर्गीय प्राचार्या ज्ञानज्योती शुभांगी गावडे यांच्या तैलचित्राचे अनावरण प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षीय मनोगतात संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी, शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे यांनी या संस्थेची स्थापना करुन शिक्षणाच्या क्षेत्रात क्रांतीकारक परिवर्तन घडवून आणले. शिक्षणातील संधी आणि आव्हाने ओळखून बापूजींनी कार्य केले. या शिक्षण यज्ञात बापूजींनी अव्याहतपणे कार्य केले, असे प्रतिपादन केले. प्रास्ताविक संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा.कौस्तुभ गावडे यांनी केले. यावेळी त्यांनी संस्थेच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेतला आणि खासदार धनंजय महाडिक यांच्या सामाजिक कार्याची ओळख करुन दिली.